महा मेट्रो

PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

***महा मेट्रो : मेट्रो संवाद,सहयोग केंद्र, स्वतंत्र टोल फ्री दूरध्वनी क्रमांक, माहिती केंद्र द्वारे शहरातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा महा मेट्रोचा प्रयत्न***

पुणे ११ : पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे कार्य शहरात जलद गतीने सुरु असून नागरिकांची उतुस्कता दिवसेंदिवस मेट्रो करता वाढत आहे. महा मेट्रोचे कार्य आता आकर्षणाचा विषय झाला असून या कामाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पिंपरी चिंचवड रस्त्यावर मेट्रो पिलर सोबतच मेट्रो स्टेशनच्या पियर आर्मचे कार्य देखील जलद गतीने सुरु आहे. डिसेंबर २०१९ पर्यंत प्रायोरिटी सेक्शन मार्गावर म्हणजेच (पिंपरी-चिंचवड)येथे मेट्रो वाहतूक सुरु करण्याचा मानस महा मेट्रोने योजिला आहे. या सर्व कामाव्यतिरिक्त महा मेट्रो द्वारे जास्तीत जास्त नागरिकांन मेट्रो प्रकल्पाविषयी माहिती प्रदान करण्याकरीता विविध उपक्रम राबविल्या जात आहे. :

***मेट्रो संवाद*** महा मेट्रो,पुणे द्वारे आता पर्यंत १०० पेक्षा जास्ती ठिकाणी मेट्रो संवाद चे आयोजन केले असून या मेट्रो संवाद मध्ये नागरिकांच्या शंकाचे

निराकरण अधिकाऱ्याद्वारे केले जाते. मेट्रो संवाद चे आयोजन प्रत्येक रिच मध्ये तसेच मेट्रो स्थानक जवळ करण्यात येत आहे.

***सहयोग केंद्र*** महा मेट्रोने तयार केलेले पौंड रोड व वल्लभ नगर येथील सहयोग केंद्राला नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांच्या शंकांची उत्तरे देण्यासाठी महामेट्रोचे चार प्रतिनिधी या केंद्रात सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत दररोज उपलब्ध असतात. या सहयोग केंद्रात मेट्रोची माहिती पुस्तिका उपलब्ध असून, मेट्रोचे मार्ग, स्थानके, मेट्रोमुळे नागरिकांना होणारे फायदे आदीची माहिती याठिकाणी उपलब्ध आहे. याशिवाय पर्यावरण संवर्धनासाठी महामेट्रोतर्फे राबविण्यात येत असलेले हरित उपक्रम, अपघातात होणारी घट, प्रदूषणाचे कमी होणारे परिणाम, स्थानिकांना मिळणारा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार, प्रवासाचा कमी होणारा वेग अशा प्रकारची माहिती नागरिकांना दिली जात आहे. या सहयोग केंद्रावर नागरिक व प्रवासी आपल्या तक्रारी व सूचना नोंदवू शकतील व तक्रारीच्या अनुपालना संबधी माहिती घेवू शकतील. ‘सहयोग केंद्रा’ मुळे वाहतुक पोलीस व अन्य शासकीय संस्था उदा. अग्निशामन विभाग, महानगरपालिका ईत्यादी यंत्रणेशी समन्वय साधने सुलभ झाले आहे.

***स्वतंत्र टोल फ्री दूरध्वनी क्रमांक :*** नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र टोल फ्री दूरध्वनी क्र. १८०० २७०० ५५७ स्थापित करण्यात आला आहे. या दूरध्वनी क्रमांकावर नागरिक आपल्या तक्रारी व सूचना नोंदवू शकतात. या व्यतिरिक्त नागरिकांच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त सुविधा पुरविण्यात येत आहेत :

१. महत्वाच्या ठिकाणी उदा. ‘जंगली महाराज रोड’ येथे सीसीटीव्ही सुविधा पुरविण्यात येईल.
२. वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त प्रशिक्षित ‘वाहतूक मार्शल’ देखील उपलब्ध आहे .

याचबरोबर पुणे मेट्रो सामाजिक माध्यमांवर देखील सक्रीय असून, पुणे मेट्रो वेबसाईट, फेसबुक पेज, ट्विटर , यू-ट्यूब यावर प्रकल्पाची होणारी परगती आणि आवश्यक माहिती देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

***माहिती केंद्र :*** पूर्व-पश्चिम व उत्तर दक्षिण मार्गाने मेट्रो रेल्वे सुरु होणार असली तरी मेट्रो शहरातील नागरिकांना घेऊन धावणार आहे. मेट्रो रेल्वेच्या डब्यातील सुविधा कशी असेल ? याबाबत नागरिकांची उतुस्कता प्रतिकृतीद्वारे दूर केल्या जात आहे. संभाजी उद्यान (बालगंधर्व परिसर) येथील माहिती केंद्रात मेट्रो रेल्वे डब्याच्या प्रतिकृतीने अनेकांना वेड लावल्याचे चित्र गर्दीवरून दिसून येते.

महा मेट्रो तर्फे शहरात मेट्रोची कामे वेगात सुरु आहे. पिंपरी-चिंचवड मार्गावरील मेट्रोचे पिलर आणि गर्डर सध्या येणाऱ्या-जाणाऱ्यासाठी आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. तसेच बालगंधर्व परिसर येथील माहिती केंद्रातील मेट्रो रेल्वेच्या डब्याची प्रतिकृती चिमुकल्यांपासून मोठ्यापर्यंत साऱ्यांचीच उत्सुकता वाढवत आहे. बालगंधर्व समोरून जात असतांना मेट्रो रेल्वेचा डबाच ठेवल्याचे दिसून येते. जवळ गेल्यानंतरच ती प्रतिकृती असल्याचे लक्षात येते. त्यात बसणे,उभे राहण्याची व्यवस्था,स्वयंचलित प्रवेशद्वार सारे काही मेट्रोच्या अस्सल डब्याचे संकेत देत आहे. याशिवाय माहिती केंद्र (मेट्रो कोच) येथे नागरिक सेल्फी घेत हे क्षण आपल्या कॅमेरामध्ये टिपत आहे तसेच या माहिती केंद्रात दररोज ४०० नागरिक भेट देत असूनमाहिती केंद्रात मेट्रो रेल्वेच्या सर्वच कामांबाबत तसेच संचालनाची माहिती नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाते.त्यामुळे सर्वसामान्यांपर्यंत मेट्रो रेल्वे पोहोचल्याचे चित्र आहे.

महाव्यवस्थापक (जनसंपर्क)
महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड